## L. A. BILL No. III OF 2024.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA POLICE ACT.

## सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३.

**महाराष्ट्र पोलीस अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९५१ चा २२. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र पोलीस अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी ३०५५ (१०४०-२-२०२४)

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र पोलीस अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे.) याच्या कलम २ मध्ये, खंड (१४अ-१) मधील, " महामार्ग वाहतूक " या मजकुरानंतर, " विभाग, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. १९५१ चा २२.

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २२जे-३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २२जे-३ मध्ये, पोट-कलम (१) मधील, " महामार्ग वाहतूक " या मजकुरानंतर, " विभाग, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२जे-३ मध्ये, राज्य पोलीस दलाच्या विशेषीकृत अभिकरणांच्या स्तरावर पोलीस आस्थापना मंडळे घटित करण्याची तरतूद केली आहे. विशेषीकृत अभिकरणांमध्ये, गुन्हे अन्वेषण विभाग, राज्य गुप्तवार्ता विभाग, नागरी हक्क संरक्षण, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, राज्य राखीव पोलीस दल, दहशतवाद विरोधी पथक, महामार्ग वाहतूक व प्रशिक्षण संचालनालय यांचा समावेश केला आहे, तथापि, त्यामध्ये, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग यांचा समावेश केलेला नाही.

२. म्हणून, विशेषीकृत अभिकरणांमध्ये, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग यांचा समावेश करणे इष्ट आहे असे शासनास वाटते. म्हणून, महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम २ व कलम २२जे-३ मध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **देवेंद्र फडणवीस,**

दिनांक २१ फेब्रुवारी २०२४. उप मुख्यमंत्री.

ɤ

**सन २०२४ चे वि. स. विधेयक क्रमांक ३—महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२४ याचे परिशिष्ट**

**(महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ यातील उतारे.)**

**(सन १९५१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२)**

**१.** ** ** **

**२.** विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर, या अधिनियमात,— व्याख्या.

(१) ते (१३ अ) ** ** **

(१४) ते (१४ अ) ** ** **

" (१४ अ-१) " विशेषीकृत अभिकरणे " याचा अर्थ, गुन्हा अन्वेषण विभाग, राज्य गुप्तवार्ता विभाग, नागरी हक्क संरक्षण, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, राज्य राखीव पोलीस दल, दहशतवाद विरोधी पथक, महामार्ग वाहतूक व प्रशिक्षण संचालनालय, असा आहे ; ".

(१४ब) ते (१४ ड) ** ** **

(१५) ते (१७) ** ** **

**३.** ते **२१.** ** ** **

**२२.** ते **२२ आय.** ** ** **

**२२ जे.** ते **२२ जे-२.** ** ** **

**२२ जे-३.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, गुन्हा अन्वेषण विभाग, राज्य गुप्तवार्ता विभाग, नागरी हक्क संरक्षण, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, राज्य राखीव पोलीस दल, दहशतवाद विरोधी पथक, महामार्ग वाहतूक व प्रशिक्षण संचालनालय या विशेषीकृत अभिकरणांच्या स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ या नावाने संबोधण्यात येणारे एक मंडळ घटित करील. विशषीकृत अभिकरणांच्या स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ.

(२) ** ** **

**२२ जे-४.** ** ** **

**२२ के** ते **२२ टी.** ** ** **

**२३.** ते **१६८.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३.]**

**[महाराष्ट्र पोलीस अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.]

**[विधानसभेने दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई